# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
## कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वास्तुशास्त्रज्ञ / नियोजन सल्लागाराच्या पॅनलवर वास्तुशास्त्रज्ञ / सल्लागारांची नेमणूक करण्याबाबत.
## (सन २०२३ ते २०२७ करिता)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या विभागीय घटक असलेल्या कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या विविध गृहनिर्माण व इतर योजनांचे आराखडे / नकाशे तयार करण्याचे काम अनेकदा व्यावसायिक वास्तुशास्त्रज्ञ / संमंत्रकांमार्फत तयार करुन घेण्यात येते. खालील बाबींमध्ये स्वारस्य असणा-यांनी विहीत नमुन्यात सविस्तर माहिती पाठवावी.

१. गृहनिर्माण योजना
२. लॅडस्केपींग कामे

कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यक्षेत्रात ठाणे , रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर या महाराष्ट्रातील जिल्हयांचा समावेश आहे.
वास्तुशास्त्रज्ञांकडे खालील बाबी असणे आवश्यक आहे.

अ) वास्तुशास्त्रज्ञांच्या परिषदेमध्ये (Council of Architecture) नोंदणीकृत.

ब) गृहनिर्माण पॅनेलसाठी कमीत कमी ५ वर्षाचा व्यावसायिक अनुभव व लॅडस्केप पॅनेलसाठी ३ वर्षाचा अनुभव.

क) समंत्रक वास्तुशास्त्रज्ञांनी कमीत कमी ३ गृहनिर्माण योजनांचे काम प्रत्येकी किमान रु.४.५ कोंटीचे किंवा ३००० चौ.मी.बांधकाम क्षेत्रफळांचे गृहनिर्माण प्रकल्प व १०० चौ.मी.पेक्षा कमी नसलेले व्यापारी किंवा इतर प्रकारचे प्रकल्पाचे काम पूर्ण केलेले असणे आवश्यक आहे.

ड) गृहनिर्माण पॅनेलकरिता फर्मच्या सेवेत कमीत कमी एक वास्तुशास्त्रज्ञ व लॅडस्केप पॅनेलसाठी एक तस्सम शैक्षणिक पात्रताधारक सहायक असणे आवश्यक आहे.

इ) वास्तुशास्त्रज्ञांच्या फर्ममध्ये सर्व पार्टनर COA नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे.

सदर माहिती ही विहीत नमुन्यात देणे आवश्यक आहे.सदरचा विहीत नमुना लेटरहेडवर खालील पत्त्यावर अर्ज केल्यानंतर व्यक्तीशः अथवा २३ से.मी.X १० से.मी.आकाराच्या पाकीटावर स्वतःचा पत्ता व आवश्यक पोस्ट स्टॅप चिकटवून आजपासून दि. ०५/१२/२०२२ या कालावधीत पाठविल्यास पुरविण्यात येईल. सदर विहीत नमुन्यातील अर्जाची किंमत रुपये ५००/- वस्तु व सेवाकर रुपये ९०/- असे एकूण रुपये ५९०/- असून ती रोखीने (रुम क्र. १६७, तळमजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू) मुंबई-५१ यांच्याकडे) किंवा मुख्य लेखाधिकारी / कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ या नावाने बँक ऑफ महाराष्ट्र, कलानगर, बांद्रा (पु), या शाखेवर देय असलेल्या डिमांड ड्राफ्ट / पे-ऑर्डरने भरणा करुन प्राप्त करता येईल.

विहीत नमुन्यातील अर्जाची विक्री व स्विकृती वास्तुशास्त्रज्ञ विभाग कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, रुम क्र. १६६, तळमजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू) मुंबई-५१ या कार्यालयात केली जाईल. सध्या पॅनेलवर असलेल्या समंत्रक वास्तुशास्त्रज्ञ यांनीही पुन्हा विहीत नमुन्यातील अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जातील कोणतीही माहिती चुकीची आढळल्यास नोंदणी रद्द करण्यात येईल. सदर पॅनेलची मुदत ५ वर्षे म्हणजे दि. ०१/०१/२०२३ ते ३१/१२/२०२७ पर्यंत असेल. विहीत नमुन्यातील अर्ज दि.०६/१२/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ या कालावधीत या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

मुख्य अधिकारी,
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, कक्ष क्र. १६८, पोटमाळा, वान्द्रे (पू),
मुंबई - ४०० ०५१.